# राज्यातील हवामान,खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती व रब्बी हंगाम २०१९-२० पिक पेरणी, पिक परिस्थितीचा दिनांक २५/०२/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान –** राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती –**

राज्यात कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून,काढणी व मळणीची कामे प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग** – निरंक.

दि.१३.०२.२०२० अखेरच्या सप्ताहात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान निरंक आहे.

**रब्बी हंगाम २०१९-२०–** राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६.९३ लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ५८.७० लाख हेक्टर क्षेत्रावर (१०३%) पेरणी झाली आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून,काढणी सुरु आहे. हरभरा घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. गहू पिक ओंब्या लागणे, ओंबीमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणी सुरू आहे. करडई पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे. तर मका पिक कणसे लागणे, दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे.




**किड व रोग-** राज्यात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

कृषि विभागामार्फत किड व रोग नियंत्रणासाठी प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे. राज्यात किड व रोगांवरील उपाययोजना म्हणून शेतीशाळा, प्रात्यक्षिके, कृषि विद्यापिठाकडून पीक संरक्षणाचे दृष्टीने सल्ले, योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, बाधीत क्षेत्रास तज्ञांच्या भेटी, जनजागृतीसाठी विभागस्तरावर हंगामपूर्व कार्यशाळा, गावबैठका, एसएमएसद्वारे सल्ले इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**उन्हाळी हंगाम २०२०–** राज्यात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. कोल्हापूर विभागात उन्हाळी भात पिकाची रोपे लागणीची कामे पुर्णत्वाकडे असून नागपूर विभागात उन्हाळी भात पिकासाठी रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरु आहे. राज्यात उन्हाळी पिकाच्या पेरणीसाठी मशागतीची व पेरणीची कामे सुरु आहेत.

**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे होते. तसेच दिवसाच्या तपमानात वाढ झाली.

**रबी हंगाम २०१९-२०** - विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर (११०%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांची कापणी झालेल्या व ओलावा असलेल्या क्षेत्रात पिकांच्या पेरणीची कामे झाली आहेत. कडधान्ये पिके शेंगा/घाटे लागणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**उन्हाळी हंगाम २०२०-** विभागात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.०१३ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** –विभागात कापूस पिकाची अंतिम वेचणी प्रगतीपथावर आहे. तुर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.३१ लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ५.६६ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३२%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणे, ओंब्या भरणे ते निसवणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तेलबिया पिके वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**उन्हाळी हंगाम २०२०**- विभागात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.०१२ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.उन्हाळी पिके वाढीच्या अवस्थेत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग**- निरंक

**रबी हंगाम २०१९**-२०- विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.८१ लाख हेक्टर असून दि. २५ फेब्रुवारी, २०२० अखेर १२.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (६८%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. सुरु ऊसाची लागवड चालू आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**उन्हाळी हंगाम २०२०-** विभागात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.००२९ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग**-निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०७ लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ४.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते घाटे भरणे तर काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. मका पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत तर सुरु ऊसाची लागवड पुर्णत्वाकडे असून, लागवड झालेले पिक उगवणीच्या अवस्थेत आहे. करडई पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०-** विभागात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.००२७ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. भात रोपे लागणीची कामे पुर्णत्वाकडे असून, वैशाखी मूग, मका व भुईमूग पिकाच्या पेरण्या सुरु आहेत. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाच्या वेचणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.७२ लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ९.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२६%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा, घाटे लागणे, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणे ते ओंबीमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक कणसे लागणे ते कणसे भरणेच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे लागणे ते कणसे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ११.१४ लाख हेक्टर असून दि. २५ फेब्रुवारी, २०२० अखेर १४.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३१%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. गहू पिक ओंब्या पक्वतेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. करडई पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिकाची कापणी आणि मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग**- निरंक

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४७ लाख हेक्टर असून दि. २५ फेब्रुवारी २०२० अखेर ७.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (११७%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०** विभागात उन्हाळी हंगामाची मशागतीची कामे प्रगतीपथावर आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, कापणी व मळणी प्रगतीपथावर आहे. कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग**- निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१२ लाख हेक्टर असून दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ४.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक ओंब्या लागणे ते ओंब्या भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत. ज्वारी पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. इतर कडधान्ये पिके फुलोरा ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०**- विभागात उन्हाळी भात पिकासाठी रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरु आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**उन्हाळी हंगाम २०२०**- विभागात दि.२५ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.

महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०१९-२० मुख्य पिकाखालील दि. २५.०२.२०२० पर्यंतचा पेरणीचा साप्ताहीक प्रगती अहवाल.

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (१२-१३ ते १६-१७) | मागिल वर्षाची पेरणी दि २२/०२/२०१९ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २६७८५१३ | १२४६३४२ | १९०३६२९ | ७१ | १५३ |
| २ | गहू | १०१४८०४ | ५६९२७२ | १२१३०३२ | १२० | २१३ |
| ३ | मका | २२५२६० | ११५४१९ | २९०६२५ | १२९ | २५२ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १२४६२ | १३०३३ | १०३६९ | ८३ | ८० |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३९३१०३९** | **१९४४०६५** | **३४१७६५५** | **८७** | **१७६** |
| ५ | हरभरा | १४९०२४७ | १२९२७८७ | २२८९०७५ | १५४ | १७७ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०९९८६ | १०९६८४ | १२२७७६ | ११२ | ११२ |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **१६००२३३** | **१४०२४७१** | **२४११८५१** | **१५१** | **१७२** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५५३१२७१** | **३३४६५३६** | **५८२९५०६** | **१०५** | **१७४** |
| ७ | करडई | ८७६०४ | १८००० | १८९९४ | २२ | १०६ |
| ८ | जवस | २१५०४ | ७६१८ | ८६९२ | ४० | ११४ |
| ९ | तीळ | १४५२ | ५०८ | ५१० | ३५ | १०१ |
| १० | सुर्यफुल | ४१६३२ | ३५२४ | २७८६ | ७ | ७९ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | ९६०१ | ५७४३ | ९७०५ | १०१ | १६९ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **१६१७९३** | **३५३९३** | **४०६८८** | **२५** | **११५** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५६९३०६५** | **३३८१९२९** | **५८७०१९३** | **१०३.११** | **१७४** |
| | टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित | | | | | |